श्री.वारणा शिक्षण संस्था,संचलित

# वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द

# व

# बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024

दि.15 एप्रिल ते 17 एप्रिल 2024

## वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024

**प्रथम पुष्प : सोमवार दिनांक 15 एप्रिल 2024**

**व्याख्यान :** प्रा.राजा माळगी, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा
**विषय:** चला जागे होऊया...!
**उद्घाटक:** प्राचार्य डॉ.सुषमा नायकवडी
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा
**प्रमुख पाहुणे:** प्राचार्य डॉ.अरुण जाधव
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर

**द्वितीय** पुष्प : मंगळवार दिनांक 16 एप्रिल 2024

**व्याख्यान :** श्री.जयवंत आवटी,ग्रामीण कथाकथनकार,कुंडल
**विषय:** आनंदात जगू चला (कथाकथन)
**अध्यक्ष :** प्राचार्य डॉ.अरुण पाटील
कर्मवीर भाऊराव पाटील, महाविद्यालय इस्लामपूर
**प्रमुख पाहुणे:** प्राचार्य डॉ.अंकुश बेलवटकर
मालती वसंतदादा पाटील,महाविद्यालय इस्लामपूर

**तृतीय** पुष्प : बुधवार दिनांक 17 एप्रिल 2024

**व्याख्यान :** सौ.तृप्ती चौगुले, तारदाळ (कोल्हापूर)
**विषय:** आजची तरुणाई आणि त्यांचे ध्येय.
**अध्यक्ष :** प्राचार्य डॉ. उज्वला पाटील
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड
**प्रमुख पाहुणे:** प्राचार्य डॉ. राजेंद्र बनसोडे
विश्वासराव नाईक कला वाणिज्य व बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा.

---

**वेळ :** सायंकाळी ७ वाजता
**स्थळ :** स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सभागृह,सोसायटी जवळ,
ऐतवडे खुर्द ता. वाळवा जि.सांगली

----------------------***************----------------------

## वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

### बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024

### व्याख्यान सत्र

---

तारीख : सोमवार दिं.15 एप्रिल 2024
व्याख्यान : प्रा.राजा माळगी, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा
विषय: चला जागे होऊया...!

---

तारीख : मंगळवार दिं.16 एप्रिल 2024
व्याख्यान : श्री.जयवंत आवटी,ग्रामीण कथाकथनकार,कुंडल
विषय: आनंदात जगू चला(कथाकथन)

---

तारीख : बुधवार दि.17 एप्रिल 2024
व्याख्यान : सौ.तृप्ती चौगुले, तारदाळ (कोल्हापूर)
विषय: आजची तरुणाई आणि त्यांचे ध्येय.

---

**वेळ :** सायंकाळी ७ वाजता
**स्थळ :** स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सभागृह,सोसायटी जवळ,
ऐतवडे खुर्द ता. वाळवा जि.सांगली

-----------------------***************-----------------------

## **वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024**
**प्रथम पुष्प : सोमवार दिनांक 15 एप्रिल 2024**

**कार्यक्रम पत्रिका**

- दीप प्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते
- स्वागत प्रास्ताविक : डॉ. सूरज चौगुले
- प्रमुख मान्यवरांचे स्वागत

- व्याख्याते : **प्रा.राजा माळगी**, हस्ते - अध्यक्ष, बुद्धविकास वाचनालय ऐतवडे खुर्द
  क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा

- उद्घाटक: **प्राचार्य डॉ.सुषमा नायकवडी** हस्ते - प्राचार्य, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द
  क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा

- प्रमुख पाहुणे: **प्राचार्य डॉ.अरुण जाधव**, हस्ते - उपाध्यक्ष, बुद्धी विकास वाचनालय, ऐतवडे खुर्द
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर

- प्रमुख पाहुणे मनोगत : **प्राचार्य डॉ.अरुण जाधव**
- प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन **: प्रा.राजा माळगी**
- भाग्यवान श्रोता निवड व आभार : **प्रा.अमित पाटील**
- सूत्रसंचालन : **प्रा.सौ.रेखा पाटील**

--------------***************-------------

सोमवार दिनांक 15 एप्रिल 2024 वेळ : सायंकाळी ७ वाजता
स्थळ : स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सभागृह,
सोसायटी जवळ, ऐतवडे खुर्द ता. वाळवा जि.सांगली

--------------***************-------------

# वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024**
**द्वितीय पुष्प : मंगळवार दिनांक 16 एप्रिल 2024**

**कार्यक्रम पत्रिका**

- दीप प्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते
- स्वागत प्रास्ताविक : डॉ. प्रदीप कांबळे
- प्रमुख मान्यवरांचे स्वागत

- व्याख्याते **: श्री.जयवंत आवटी** हस्ते - अध्यक्ष, बुद्धविकास वाचनालय ऐतवडे खुर्द
  ग्रामीण कथाकथनकार,कुंडल

- अध्यक्ष : **प्राचार्य डॉ.प्रताप पाटील** हस्ते - उपाध्यक्ष, बुद्धविकास वाचनालय ऐतवडे खुर्द
  वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द

- प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन : **श्री.जयवंत आवटी**
- भाग्यवान श्रोता निवड व आभार : **प्रा.सूर्यकांत गिरी**
- सूत्रसंचालन : **प्रा.सौ.प्रज्ञा कांबळे**

--------------***************-------------

मंगळवार दिनांक 16 एप्रिल 2024 वेळ : सायंकाळी ७ वाजता
स्थळ : स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सभागृह,
सोसायटी जवळ, ऐतवडे खुर्द ता. वाळवा जि.सांगली

--------------***************-------------

## वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024**
**तृतीय पुष्प : बुधवार दिनांक 17 एप्रिल 2024**

**कार्यक्रम पत्रिका**

- दीप प्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते
- स्वागत प्रास्ताविक : **सौ.सुस्मिता वाळके**
- प्रमुख मान्यवरांचे स्वागत
- व्याख्याते : **सौ.तृप्ती चौगुले** हस्ते - अध्यक्ष, बुद्धविकास वाचनालय ऐतवडे खुर्द
  तारदाळ , कोल्हापूर
- अध्यक्ष : **प्राचार्य डॉ.उज्वला पाटील** हस्ते - प्राचार्य, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द
  बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड
- अध्यक्ष मनोगत : **प्राचार्य डॉ.उज्वला पाटील**
- प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन : **सौ.तृप्ती चौगुले**
- भाग्यवान श्रोता निवड व आभार **: डॉ.भारत उपाध्य**
- सूत्रसंचालन : **प्रा.सौ.सुवर्णा आवटी**

--------------***************-------------

बुधवार दिनांक 17 एप्रिल 2024 वेळ : सायंकाळी ७ वाजता
स्थळ : स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सभागृह,
सोसायटी जवळ, ऐतवडे खुर्द ता. वाळवा जि.सांगली

--------------***************-------------

**वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**दि.15 एप्रिल ते 17 एप्रिल 2024**

# बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024

| क्रं | जबाबदारी | प्राध्यापक नाव | सही |
|---|---|---|---|
| 1 | व्याख्याते निश्चित करणे,<br>व्याख्यानमाला परवानगी घेणे<br>कार्यक्रम पत्रिका व अन्य निमंत्रण<br>पत्र,आभार पत्र आदि | प्रा.डॉ.सूरज चौगुले | |
| | | डॉ.प्रदीप कांबळे | |
| 2 | पत्रिका छपाई<br>डिजिटल व अन्य छपाई | प्रा. सुदाम चक्रधारी | |
| 3 | कूपन छपाई,कूपन वाटप,<br>भाग्यवान श्रोता भेटवस्तू<br>कूपन हिशोब | सौ.प्रज्ञा कांबळे | |
| | | सौ.सुषमा जाधव | |
| | | सौ.रेखा पाटील | |
| | | सौ.सुस्मिता वाळके | |
| 4 | स्वागत साहित्य,स्टेज व्यवस्था,<br>भाग्यवान श्रोता निवड | श्री.संतोष जाधव | |
| | | डॉ.भारत उपाध्य | |
| 5 | पाहुणे चहापान व स्वागत | प्रा.अमित पाटील | |
| | | प्रा.सूर्यकांत गिरी | |
| 6 | फोटो, बातमी | प्रा.आंनदा पाढरबळे | |
| | | प्रा.डॉ.सूरज चौगुले | |
| 7 | मानधन व्हावचर सही | श्री. सुधीर चांदणे | |

**वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**दि.15 एप्रिल ते 17 एप्रिल 2024**

# बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024

# जमा-खर्च

| जमा | खर्च |
|---|---|
| 1.श्री.सुधीर चांदणे - रु. 15000/-<br>2. बुद्धिविकास विकास - रु. 15000/-<br>-----------------------------<br>**रु.30000/-**<br>**3.कूपन विक्री -**<br>i. माध्यमिक विद्यालय,कुरळप - 900/-<br>ii.शिवराज विद्यालय,ऐतवडे खुर्द - 2370/-<br>iii.आदर्श बालक मंदिर ऐतवडे खुर्द - 3020/-<br>-----------------------------------<br>रु. 6290/-<br><br>**एकूण जमा - 36290 /-** | **व्याख्याते मानधन :**<br>1.प्रा.राजा माळगी - रु.5000/-<br>2.श्री.जयवंत आवटी - रु.7000/-<br>3.सौ.तृप्ती चौगुले - रु.3000/-<br>-----------------------------------<br>**एकूण - 15000/-**<br>**व्याख्याते जेवण :**<br>1.प्रा.राजा माळगी - रु.2381/-<br>3.सौ.तृप्ती चौगुले - रु.2192/-<br>-----------------------------------<br>**एकूण - 4573/-**<br>**अन्य खर्च :**<br>1.सेल,पाणी बोटल व पूजा साहित्य- रु.200/-<br>2.भाग्यवान श्रोता गिफ्ट पंकिंग- रु.150 /-<br>3.हार बुके - रु.650/-<br>4.सन्मानचिन्ह नावे चिटकवणे- रु.280/-<br>5. फोटो - रु.150<br>-----------------------------------<br>**एकूण - 1430 /-**<br>-----------------------------------<br>**एकूण खर्च - 21003 /-**<br>**शिल्लक- 15287 /-**<br>-----------------------------------<br>**36290/-** |

# वारणा महाविद्यालय,ऐतवडे खुर्द व बुद्धिविकास वाचनालय,ऐतवडे खुर्द

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**दि.15 एप्रिल ते 17 एप्रिल 2024**

# बापूजी स्मृती व्याख्यानमाला 2024

# अहवाल

सालाबाद प्रमाणे साहित्यप्रज्ञ स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द व बुद्धी विकास वाचनालय ऐतवडे खुर्द यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 15 ते 17 एप्रिल दरम्यान बापूजी स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. गेली सव्वीस वर्षे अखंड सुरू असलेल्या या व्याख्यानमालेचे हे सत्तविसावे वर्ष होते. व्याख्यानमालेमध्ये तीन व्याख्यानाचे आयोजन केले गेले. महाराष्ट्रातील नामवंत वक्ते व्याख्यानमाले मध्ये आमंत्रित करण्यात आले.

बापूजी स्मृती व्याख्यानमालेमध्ये दिनांक **15 एप्रिल रोजी संत साहित्याचे अभ्यासक प्रा. राजा माळगी,** क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय वाळवा यांचे **चला जागे होऊया** या विषयावर व्याख्यान झाले. समाज जीवनातील आजूबाजूचे अनेक बदल लक्षात घेत आजच्या तरुणांनी स्वतःमध्ये परिवर्तन करणे गरजेचे असल्याचे यावेळी प्रा. राजा माळगी यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुषमा नायकवडी तर प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ.अरुण जाधव हे होते.. **दिनांक 16 एप्रिल रोजी ग्रामीण कथाकथनकार जयवंत आवटी** यांचे **कथाकथन** झाले. ग्रामीण भागातील अनेक बारकावे टिपत त्यांनी आपल्या कथेमधून ग्रामजीवन उभे केले विनोद हा निश्चितपणे मानवी जीवनाला आनंद देणारा जितका आहे तितकाच तो समाजातील अनेक त्रुटींवर भाष्य करणारा असतो हे यावेळी त्यांनी नमूद केले. अध्यक्षस्थानी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील हे होते**. दिनांक 17 एप्रिल रोजी सौ. तृप्ती चौगुले तारदाळ** यांचे **आजची तरुणाई आणि त्यांचे ध्येय** या विषयावर व्याख्यान झाले. तारुण्य हे प्रत्येकाला मिळालेली एक विधातेची देणगी आहे या तारुण्यातुनच आपलं स्वतःचं आयुष्य मनुष्य घडवू शकतो याची जाणीव तरुणांनी ठेवणे गरजेचे असल्याचे मत तृप्ती चौगुले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.उज्वला पाटील या होत्या प्राचार्य डॉ.राजेंद्र बनसोडे यांची उपस्थिती होती.

गेली 27 वर्ष अखंडितपणे सुरू असलेल्या या व्याख्यानमालेमध्ये भाग्यवान श्रोता निवडले गेले.याबरोबरच विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार या ठिकाणी संपन्न झालं. व्याख्यानमालेसाठी परिसरातील श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, वाचनालयाचे अध्यक्ष पी. एम.पाटील, सचिव श्री.सर्जेराव माने व्याख्यानमाला समिती सदस्य प्रा. सुदाम चक्रधारी यांचे सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, वारणा संकुलातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.डॉ. सुरज चौगुले**

**समन्वयक**

**बापूजी स्मृती व्याख्यानमाला**

# बुद्धी विकास वाचनालय, ऐतवडे खुर्द
# व
# वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द

यांचे संयुक्त विद्यमाने

# बापूजी स्मृती व्याख्यानमाला

## वर्ष २७ वे

## दि. १५ ते १७ एप्रिल २०२४



**स्व. बाजीराव बाळाजी पाटील**
(साहित्यप्राज्ञ)

- **मा. डॉ. प्रताप पाटील** — प्राचार्य, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द
  व्याख्यानमाला समन्वयक
- **श्री. पी. एम. पाटील** — अध्यक्ष, बुद्धीविकास वाचनालय, ऐतवडे खुर्द,
  व्याख्यानमाला समितीप्रमुख

■ वेळ : सायं ७.०० वाजता ■ स्थळ : स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सभागृह, सोसायटी जवळ ऐतवडे खुर्द

पुष्प पहिले : सोमवार दि. १५ एप्रिल २०२४

वक्ते

**प्रा. राजा माळगी**

क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा.

विषय : चला जागे होऊया...!



उद्घाटक :

**प्राचार्य सुषमा अरुण नायकवडी**

क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा.

प्रमुख पाहुणे :

**प्राचार्य डॉ. अरुण जाधव**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर.

**प्रायोजक**

श्री वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द.

श्री वारणा ग्रामविकास ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था, ऐतवडे खुर्द.

शेतकरी सह. दूध उत्पादक संस्था, ऐतवडे खुर्द.

श्री. बाजीराव बाबासो पाटील ऐतवडे खुर्द. सर्व से. सहकारी सो. ऐतवडे खुर्द.

श्री. तात्यासाहेब कोरे वारणा सह. पाणी पुरवठा संस्था, ऐतवडे खुर्द.

---

पुष्प दुसरे : मंगळवार दि. १६ एप्रिल २०२४

वक्ते

**श्री.जयवंत आवटी**

ग्रामीण कथाकथनकार, कुंडल.

विषय : आनंदात जगू चला (कथाकथन)



अध्यक्ष :

**प्राचार्य डॉ. अरुण पाटील**

कर्मवीर भाऊराव पाटील,
महाविद्यालय, इस्लामपूर.

प्रमुख पाहुणे :

**प्राचार्य डॉ. अंकुश बेलवटकर**

मालती वसंतदादा पाटील,
महाविद्यालय, इस्लामपूर.

**प्रायोजक**

श्री भैरवनाथ वारणा सह. पाणी पुरवठा संस्था,ऐतवडे खुर्द.

श्री. दत्त वारणा सह. पाणी पुरवठा संस्था, ऐतवडे खुर्द.

श्री. बाजीराव बा. पाटील वारणा सह. पाणी पुरवठा, ऐतवडे खुर्द.

श्री वारणा शिक्षण संस्था सेवकांची सह. पतसंस्था, ऐतवडे.

श्री वारणा महिला सह. पतसंस्था, ऐतवडे खुर्द

---

पुष्प तिसरे : बुधवार दि. १७ एप्रिल २०२४

वक्ते

**सौ.तृप्ती चौगुले**

तारदाळ (कोल्हापूर)

विषय : आजची तरुणाई आणि त्यांचे ध्येय.



अध्यक्ष :

**प्राचार्य डॉ. उज्वला पाटील**

बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड

प्रमुख पाहुणे :

**प्राचार्य डॉ. राजेंद्र बनसोडे**

विश्वासराव नाईक कला वाणिज्य व
बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा

**प्रायोजक**

जिजामाता महिला सह. दुध उत्पादक संस्था, ऐतवडे खुर्द

श्री वारणा फळे फुले व भाजीपाला खरेदी व विक्री सहकारी संस्था, ऐतवडे खुर्द

बाजीराव बा. पाटील सह. औद्योगिक सेवा संस्था मर्या., ऐतवडे खुर्द

मा. बाजीराव पाटील समाज विकास ट्रस्ट, ऐतवडे खुर्द

बुक-पोस्ट

प्रति,
सौ/श्री. ____________________

# ऐतवडे खुर्द येथे १५ एप्रिलपासून स्मृती व्याख्यानमाला

**केसरी वृत्तसेवा**

**शिराळा :** साहित्यप्रज्ञ बाजीराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त वारणा महाविद्यालय व बुद्धी विकास वाचनालय ऐतवडे खुर्द यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ ते १७ एप्रिल या कालावधीमध्ये बापूजी स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले असल्याची माहिती वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांनी दिली. बापूजी स्मृती व्याख्यानमालेमध्ये दि. १५ एप्रिल रोजी संत साहित्याचे अभ्यासक प्रा. राजा माळगी यांचे 'चला जागे होऊ या' विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुषमा नायकवडी तर प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ.अरुण जाधव हे आहेत. दि १६ एप्रिल रोजी ग्रामीण कथाकथनकार जयवंत आवटी यांचे कथाकथन होणार आहे, अध्यक्षस्थानी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील हे आहेत. दि. १७ एप्रिल रोजी तृप्ती चौगुले तारदाळ यांचे 'आजची तरुणाई आणि त्यांचे ध्येय' या विषयावर व्याख्यान होणार आहे, यावेळी अध्यक्ष प्राचार्य डॉ.उज्वला पाटील, प्राचार्य डॉ.राजेंद्र बनसोडे यांची उपस्थिती आहे. गेली २७ वर्षापासून या व्याख्यानमालेचे आयोजन केले जात आहे. व्याख्यानमालेसाठी सर्व श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष पी.एम.पाटील यांनी केली आहे.



बाजीराव पाटील

व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ.प्रताप पाटील ,प्राचार्य डॉ.अरुण जाधव,प्रा.राजा माळगी



व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफताना प्रा.राजा माळगी मंचावर प्राचार्य डॉ.प्रताप पाटील ,प्राचार्य डॉ.अरुण जाधव,प्राचार्य डॉ.सुषमा नायकवडी,आप्पासाहेब खराडे,अध्यक्ष पी.एम.पाटील,समन्वयक डॉ.सूरज चौगुले



व्याख्यानमालेचे दुसरे  पुष्प गुंफताना श्री.जयवंत आवटी मंचावर प्राचार्य डॉ.प्रताप पाटील ,प्राचार्य डॉ.पी.टी.पाटील,सर्जेराव माने,आप्पासाहेब खराडे,अध्यक्ष पी.एम.पाटील,समन्वयक डॉ.सूरज चौगुले




व्याख्यानमालेचे तिसरे  पुष्प गुंफताना सौ.तृप्ती चौगुले प्राचार्य डॉ.प्रताप पाटील,प्राचार्य डॉ.उज्वला पाटील डॉ.पी.टी.पाटील, सर्जेराव माने, आप्पासाहेब खराडे, अध्यक्ष पी.एम.पाटील, समन्वयक डॉ.सूरज चौगुले



# प्रसार माध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे तरुणांची डोकी अशांत

**बंधुता न्यूज नेटवर्क**

ऐतवडे खुर्द : देशाचा समृद्ध इतिहास विसरायला लावत, मूल्यहीन आणि संस्कारहीन पिढी निर्माण करण्याचे षडयंत्र वैश्विक स्तरावरील बहुराष्ट्रीय कंपन्या करीत आहेत. त्याला भारतीय समाज बळी पडत असल्याचे मत प्रा. राजा माळगी यांनी व्यक्त केले. ऐतवडे खुर्द येथे वारणा महाविद्यालय व बुद्धी विकास वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बापूजी स्मृती व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय वाळवाच्या प्राचार्य डॉ. सुषमा नायकवडी या उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रताप पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.अरुण जाधव हे उपस्थित होते.

आता जागे होऊया, या विषयावर बोलताना प्रा. माळगी म्हणाले, समाजामध्ये भोग प्रवृत्ती बळावत चालली असून हिंसक तरुण आजूबाजूला वावरताना दिसत आहेत. प्रसार माध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे तरुणांची डोकी अशांत झालेली आहेत. गेल्या तीस वर्षात जगाशी स्पर्धा



करण्याइतकी प्रगती भारत देशाने केली आहे. परंतु ती भौतिक स्वरूपातील प्रगती आहे. आमची मुलं उच्चशिक्षित झाली परंतु या मुलांच्या कडूनच घरातील संस्कार आणि मूल्य पायदळी तुडविली जात असल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली.

उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. सुषमा नायकवडी म्हणाल्या, आजच्या संक्रमण काळात वाचन संस्कृती आणि वाचन चळवळ जपणे आवश्यक आहे. वारणा महाविद्यालय व बुद्धी विकास वाचनालयाने ही चळवळ जपण्याचा प्रयत्न केला असल्याचे गौरवउद्गार त्यांनी यावेळी काढले. यावेळी प्राचार्य डॉ.अरुण जाधव यांनी, समाजामध्ये परिवर्तन होत असून आजच्या तरुणाईवर आपला विश्वास असल्याचे मत प्रकट केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. सुरज चौगुले यांनी केले तर आभार प्रा.अमित पाटील यांनी मानले, डॉ. भारत उपाध्ये यांनी भाग्यवान श्रोता निवडला, सूत्रसंचालन प्रा. रेखा पाटील यांनी केले.

---

**पुढारी**

# षड्यंत्राला भारतीय समाज बळी

## प्रा. माळगी : मूल्यहीन, संस्कारहीन पिढी निर्माण होत आहे

ऐतवडे खुर्द : पुढारी वृत्तसेवा

[illegible]



ऐतवडे खुर्द : येथे व्याख्यानमालेत बोलताना प्रा. राजा माळगी, बाजूस डॉ. प्रताप पाटील व इतर.

[illegible]

My Sangli Edition
Apr 18, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

---

# संस्कारहीन पिढी निर्माण करण्याचे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे षड्यंत्र : प्रा. माळगी

■ सकाळ वृत्तसेवा

ऐतवडे खुर्द, ता. १६ : देशाचा समृद्ध इतिहास विसरायला लावत, मूल्यहीन आणि संस्कारहीन पिढी निर्माण करण्याचे षड्यंत्र वैश्विक स्तरावरील बहुराष्ट्रीय कंपन्या करीत आहेत. त्याला भारतीय समाज बळी पडत असल्याचे मत प्रा. राजा माळगी यांनी व्यक्त केले.

येथील वारणा महाविद्यालय व बुद्धिविकास वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बापूजी स्मृती व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा येथील प्राचार्य डॉ. सुषमा नायकवडी या उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रताप पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. अरुण जाधव उपस्थित होते.

उद्घाटक डॉ. सुषमा नायकवडी म्हणाल्या, "आजच्या संक्रमण काळात वाचनसंस्कृती आणि वाचन चळवळ जपणे आवश्यक आहे. वारणा महाविद्यालय व बुद्धिविकास वाचनालयाने ही चळवळ जपण्याचा प्रयत्न केला आहे."

प्राचार्य डॉ. अरुण जाधव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सूरज चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. अमित पाटील यांनी आभार मानले.



ऐतवडे खुर्द : येथील बापूजी व्याख्यानमालेत बोलताना प्रा. राजा माळगी. व्यासपीठावर डॉ. सुषमा नायकवडी, डॉ. प्रताप पाटील आदी.

# सुंदर आयुष्य जगण्याची किनार म्हणजे विनोद : जयवंत आवटे

**बंधुता न्यूज नेटवर्क**

ऐतवडे खुर्द : विनोदाच्या माध्यमातून समाजातील अनेक विद्रूप गोष्टीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जातो. समाजातील छोटे छोटे दोष शोधून त्याच्यावर मार्मिक भाष्य करण्याचे काम विनोद करीत असतो. आयुष्याची सुंदर जगण्याची किनार म्हणजे विनोद असल्याचे प्रतिपादन ग्रामीण कथाकार जयवंत आवटे यांनी केले.वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द व बुद्धी विकास वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बापूजी स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील हे होते. यावेळी वाचनालयाचे नवनिर्वाचित अध्यक्ष पी.एम. पाटील यांचा सत्कार करण्यात आला.



कथाकथन या विषयावर बोलताना प्रारंभी जयवंत आवटे यांनी विनोदाची निर्मिती आणि आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या अनेक गोष्टींवर खुमासदारपणे मार्मिक भाष्य केले. आपल्या जाणती या कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील चित्रण, नवदांपत्यांची होणारी ऊलाघाल, मित्रत्वाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्नेहबंध आणि निसर्गाच्या माध्यमातून व्यक्त होणारी माणसं या विषयावर भाष्य केले. आपल्या कथेच्या माध्यमातून एक कसदार विनोद आणि सकस कथामूल्य असलेली कथा त्यांनी श्रोत्यांसमोर सादर केली श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यावेळी त्यांना मिळाला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. भारत उपाध्य यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सौ. प्रज्ञा कांबळे यांनी केले तर आभार प्रा. सूर्यकांत गिरी यांनी मांनले. यावेळी वाचनालयाचे सचिव सर्जेराव माने, वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य पी टी पाटील आप्पासाहेब खराडे व्याख्यानमाला समन्वय समितीचे प्रमुख डॉ.सुरज चौगुले, प्रा. सुदाम चक्रधारी यांच्यासह अन्य मान्यवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाश्चात्य संस्कृतीमुळे आजचा तरुण दिशाहीन : तृप्ती चौगुले

**बंधुता न्यूज नेटवर्क**

ऐतवडे खुर्द : भारतीय समाजाला एक समृद्ध परंपरा लाभलेली आहे. या समृद्ध परंपरेतून आतापर्यंत भारतीय समाजाने जगापुढे आपला सांस्कृतिक वारसा उभा केला आहे. परंतु दुर्दैवाने आपल्या स्वतःच्या संस्कृतीला कमी लेखून पाश्चात्य संस्कृतीचा उदो उदो करणाऱ्या प्रवृत्तींमुळे आजची तरुणाई दिशाहीन होत असल्याची खंत समाज प्रबोधक सौ. तृप्ती चौगुले यांनी व्यक्त केली. वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द व बुद्धी विकास वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बापूजी स्मृती व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी बाबा नाईक महाविद्यालय कोकरूड च्या प्राचार्य डॉ.उज्वला पाटील या होत्या या वेळी प्राचार्य डॉ.प्रताप पाटील प्रमुख उपस्थित होते.

आजची तरुणाई आणि त्यांचे ध्येय या विषयावर बोलताना सौ. चौगुले पुढे म्हणाल्या, मनुष्यप्राणी हा अन्य प्राण्यांच्या पेक्षा वेगळा आहे, कारण त्याच्या बुद्धीचा विकास झालेला आहे. या बुद्धीच्या विकासाच्या जोरावर तंत्रज्ञानाच्या साह्याने त्याने अनेक प्रकारची भौतिक प्रगती



केली परंतु भारतीय संस्कृती ही भौतिक प्रगतीपेक्षा बौद्धिक आणि वैचारिक प्रगतीला अधिक महत्त्व देत असते, त्यामुळे आपल्या भारतीय परंपरेनुसार प्रत्येक तरुणाचा बौद्धिक, वैचारिक आणि परिपूर्ण विकास होणे आवश्यक आहे. यासाठी आई-वडिलांनी स्वतः आपल्या मुलांवर सांस्कृतिक संस्कार करणे गरजेचे असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. उज्वला पाटील म्हणाल्या तरुणांच्यावर वैचारिक संस्कार होणे गरजेचे आहेत. आजची तरुणाई ही या देशाची सकारात्मक बाजू असून त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सौ. सुष्मिता वाळके यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. सौ. सुवर्णा आवटी यांनी केले. आभार व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. सुरज चौगुले यांनी केले यावेळी वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य पी. टी. पाटील, वाचनालयाचे अध्यक्ष पी.एम.पाटील, सचिव सर्जेराव माने, विश्वस्त आप्पासाहेब खराडे यांचे सह संकुलातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रामस्थ, श्रोतावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.